MHKO110025032021

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १०/२०२२.</u>**
(CNR No.**MHKO110025032021** )

## <u>निशाणी क्र.५१ खालील आदेश.</u>

(अर्चना राजू गरगद **वि.** भगवान देवेगौडा पाटील वगैरे)

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०६ नियम १७ अन्वये त्यांच्या दाव्यामध्ये दुरूस्ती करण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. वादीचे अर्जात असे कथन आहे की, वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुद्ध करारपत्रावरुन खरेदीपत्र पूर्ण हाऊन मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी यापूर्वी त्यांची कैफियत व म्हणणे दिले आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दिनांक २३/०३/२०१५ रोजी संचकारपत्र झालेला आहे व संचकारपत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे वादी यांनी दावा मिळकत खरेदी घेणेचा संपूर्ण मोबदला प्रतिवादी यांना दिलेला आहे. तसेच वादी हे खरेदीपत्र पूर्ण करुन घेणेस तयार आहेत. दावा दाखल झाल्यानंतर दावा अर्जीमध्ये रेडी आणि विलींगनेस याबाबतचा मजकुर नमुद करण्याचे राहून गेले. त्यामुळे वादी यांना दावा अर्जीमध्ये प्रस्तुत अर्जाद्वारे दावा अर्जी कलम ४ नंतर ४(अ) व ४(ब) तसेच दावा अर्जी कलम ९ मध्ये ९(क)(क) व ९ (क)(क)(क) नंतर अर्जात नमुद केलेला मजकूर दावा अर्जी कलम मध्ये नमुद करुन दुरुस्ती होण्याबाबत विनंती केली आहे.

०३. वादीचे पुढील कथन असे की, सदर दुरुस्ती अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. परंतु याउलट वादीचे अपरिमित व कायमस्वरूपी नुकसान होणार आहे. तसेच, दावा अर्जी कलम दुरुस्ती नंतर दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब वादीने प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०४. प्रतिवादी क्र.१ यांनी पुरेशी संधी देऊन देखील प्रस्तुत अर्जावर म्हणणे सादर न केल्याने त्यांच्याविरुद्ध प्रस्तुत अर्जावर म्हणणे नाही असा आदेश पारित करण्यात आला. प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.५२ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथणे नाकारलेली आहेत. वादीने सरतपास दिलेला आहे व उलटतपास देखील पूर्ण करण्यात आलेला आहे. सदरचे काम वादीच्या पुढील पुराव्याकरीता नेमलेले आहे. सदर अर्जातील

दुरुस्ती वादीने यापूर्वी केली नाही याचे कोणतेही कारण नमुद केलेले नाही. सदर अर्जाद्वारे मुळ दाव्यातील दोष व उणीवा भरुन काढणेचा प्रयत्न करत आहेत. सबब, प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. प्रस्तुत अर्ज व त्यावर प्रतिवादींनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०६. वादीच्या अर्जातील कथने, प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे व अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचा विचार करता माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत. सदर मुद्दे त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी त्यांच्या दावा अर्जी कलममध्ये सुचवत असलेली दुरुस्ती ही, पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक आहे काय ? | **होकारार्थी.** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करिता** -

०७. मुद्दा क्र. १ व २ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदर मुद्दे चर्चेकरिता एकत्रित विचारात घेण्यात येत आहेत.

०८. पुढील विवेचन करण्यापूर्वी या ठिकाणी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ६ नियम १७ मधील खाली नमूद कायदेशीर तरतूद पाहणे उचित ठरेल.

**१७. वादकथनातील सुधारणा** -

न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोपैकी कोणत्याही पक्षकारांस, त्याच्या वादकथनास, न्याय्य असेल अशा रीतीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत.

> परंतु न्यायचौकशी सुरू झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेवुन सुद्धा न्यायचौकशी सुरू होण्यापूर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

०९. प्रस्तुतचा दावा हा करारपत्रावरुन खरेदीपत्र पूर्ण हाऊन मिळणेबाबत केल्याचे अवलोकित होते. प्रतिवादी यांनी **निशाणी क्र.१९** वर दिनांक ०५/०५/२०२२ रोजी कैफियत दिली असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणामध्ये दिनांक १८/०८/२०२३ रोजी **निशाणी क्र.२९** वर मुद्दे निश्चित केले असल्याचे दिसून येते. त्यानंतर दिनांक १९/१२/२०२५ रोजी प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज सादर केल्याचे दिसून येते. परंतु, प्रस्तुत अर्जामध्ये पूर्वीच्या वकीलांनी दाव्यामध्ये रेडी आणि विलींगनेसचा मजकुर नमुद करण्याचे राहून गेल्याचे नमुद करत त्याअनुषंगाने व तसेच साठेखताची रक्कम व्याजासह नुकसान भरपाई म्हणून परत मिळणेबाबत मजकुर नमुद करुन मिळणेसाठी प्रस्तुतचा दुरुस्ती अर्ज सादर केलेला आहे.

१०. प्रस्तुत दाव्यामध्ये निशाणी क्र.२९ वर मुद्दे निघालेले असून निशाणी क्र.३३ वर वादीचा उलटतपास देखील पूर्ण झाल्याचे दिसून येते. याचाच अर्थ दाव्याचे सुनावणीचे काम सुरु झाल्याचे अवलोकीत होते. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ०६ नियम १७ नुसार पुराव्याचे/सुनावणीचे काम सुरु होण्याअगोदर दावा दुरुस्तीस परवानगी देण्याबाबतची तरतुद आहे. परंतु त्यानंतर दावा दुरुस्ती करण्यास कोठेही मज्जाव केल्याचे दिसून येत नाही. परंतु संबंधीत पक्षकार दक्ष राहून देखील प्रस्तावीत दुरुस्ती मागू शकला नाही हे अभिलेखावर अर्जदाराने आणणे आवश्यक असते. परंतु असा मुद्दा प्रस्तुत अर्जात दिसून येत नाही. असे असले तरी विनिर्दीष्ट अनुतोष कायदा, १९६३ च्या कलम २१ च्या परंतूकात नुकसान भरपाई बाबत मागणी केली नसल्यास वादीस दाव्याच्या कोणत्याही टप्यावर दुरुस्ती मागता येत असल्याबाबतची तरतुद आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज टिकणारा आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावित बदलांमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नसुन पुराव्यात देखील बदल होणार नाही. परंतु दाव्याच्या प्राथमिक टप्यावर प्रस्तावीत दुरुस्ती न आणल्याने खर्चाबाबत आदेश करुन ते प्रतिवादी क्र.२ यांना देण्याचे निर्देष दिल्यास त्यांचे नुकसान भरुन येईल. सबब, अर्ज मंजूर होण्यास पात्र रहातो. करीता, मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ चे निष्कर्षाकरिता खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश.</u>

१. वादीचा **निशाणी क्र.५१** वरील अर्ज, रक्कम रु. ६००/- (रुपये सहाशे फक्त) प्रतिवादी क्र.२ यांना खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी दाव्यामध्ये प्रस्तावित दुरुस्ती अंतरभूत करुन सुधारित दाव्याची प्रत सादर करावी.

३. येणेप्रमाणे **निशाणी क्र.५१** वरील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2026.06.16 16:53:20 +0530

**(श्रीनिवास अ. कुलकर्णी)**

दिनांक. १६/०६/२०२६.          सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पेठ वडगांव